॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(संलग्नता विभाग)

जा.क्र. कबचौउमवि /५/संलग्नता/३७२/२०२४ दि. १०.१०.२०२४

**अत्यंत महत्त्वाचे**

प्रति,
कबचौउमविशी सलंग्नीत सर्व महाविद्यालयांचे,
मा.प्राचार्य/संचालक यांना....

विषय :-Review of Compliance Report of Statutory Audit/A.G.Audit समितीच्या दिनांक १३.०९.२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत..

संदर्भ :- जा.क्र.कबचौउमवि/८/Review Compliance/अंतर्गत-हस्तदेय/२०२४ दि. २५.०९.२०२४

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था यांना भेटी देण्यासाठी संलग्नता विभागामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या स्थानिक चौकशी समित्यांनी दिलेल्या भेटींच्या अनुषंगाने प्राप्त अहवालांमध्ये सुमारे ४२ महाविद्यालयांमध्ये College Development Committee मध्ये स्थानिक सदस्य, महिला सदस्य, माजी विद्यार्थी सदस्य यांच्या नियुक्त्या केलेल्या नसल्याची बाब Statutoy Audit/ AG Audit समितीच्या निदर्शनास आलेली आहे. तसेच काही ठिकाणी समिती नियुक्त असून, त्यातील सदस्यांची संख्या पुरेशी नसल्याचे आढळून आलेले आहे.

त्याअनुषंगाने कबचौउमविशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७ नुसार प्रत्येक महाविद्यालये तसेच मान्यता प्राप्त परिसंस्थांमध्ये College Deveopment Committee नियुक्त करणे आवश्यक असून, बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयात तसेच परिसंस्थेत College Development Committee नियुक्त करुन समिती नियुक्त केल्याबाबतचा अहवाल संलग्नता विभागास पाठवावा.

तसेच विद्यापीठामार्फत नियुक्त करण्यात आलेली स्थानिक चौकशी समिती (Local Inspection Committee) ज्यावेळी आपल्या महाविद्यालयास/परिसंस्थेस भेट देईल त्यावेळेस College Development Committee चे सदस्य त्याठिकाणी उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(संलग्नता विभाग)

प्रत:-
०१) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव
०४) सहा. कुलसचिव (अ.का.) विकास विभाग, कबचौउमवि, जळगाव